आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१८ सप्टेंबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातल्या उच्चस्तरीय समितीच्या शिफारशी केंद्रीय मंत्रीमंडळानं स्वीकारल्या, देशभरात सहमती निर्माण करुन २ टप्प्यात अंमलबजावणी होणार
- शेतकऱ्यांची उत्पन्ननिश्चिती, पोषणमूल्य आधारित खतानुदान, आणि ६३ हजार गावातल्या आदिवासींचं जीवनमान उंचावणाऱ्या योजनांनाही मंजुरी
- वर्षाला १ हजार रुपये भरून लहान मुलांच्या नावे सुरू करता येणार राष्ट्रीय पेन्शन योजनेचे वात्सल्य खाते
- जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ५८ टक्क्यांहून अधिक मतदान

**आणि**

- हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिद्ध, जुनी पेन्शन योजना आणि २५ लाख रुपयांपर्यंत उपचार मोफत देण्याचं आश्वासन

**<><><><><>**

एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातल्या उच्च स्तरीय समितीच्या शिफारशी केंद्रीय मंत्रीमंडळानं आज स्वीकारल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या

बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. या संदर्भातल्या विविध कायदेशीर बाबींची पूर्तता झाल्यावर याची अंमलबजावणी कधीपासून करायची याची तारीख निश्चित होईल, पण सरकारच्या याच कार्यकाळात याची अंमलबजावणी सुरू होईल, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कालच स्पष्ट केलं असल्याची माहिती वैष्णव यांनी दिली.

**होल्ड - अश्विनी वैष्णव (२७ सेकंद)**

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गेल्यावर्षी स्थापन केली होती. समितीकडे आलेल्या ८० टक्के प्रतिक्रिया या प्रस्तावाच्या बाजूनं होत्या. बहुतांश राजकीय पक्षांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली होती, असं वैष्णव म्हणाले. समितीच्या शिफारशींवर आता देशभरात मोठ्या प्रमाणात विस्तारानं चर्चा होईल आणि सहमती निर्माण केली जाईल, असं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे.  केंद्रीय मंत्रीमंडळातल्या इतर महत्त्वाच्या निर्णयांविषयी ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड - व्हाइस कास्ट**

*(पीएम आशा अर्थात पीएम अन्नदाता उत्पन्न संरक्षण अभियान सुरू ठेवायला केंद्रीय मंत्रीमंडळाची आज मंजुरी मिळाली. दाळी, तेलबियांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासह किमान आधारमूल्य आणि बाजार भाव यातल्या फरकाची भरपाई शेतकऱ्यांना दिली जाईल. तसंच शेतकऱ्यांचं उत्पन्न सुरक्षित ठेवणं, ग्राहकांसाठी बाजारभाव स्थिर ठेवणं यावर यात भर दिला*

*आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या कार्यकाळात यासाठी ३५ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.*

*रबी हंगामाकरता २४ हजार ४७५ कोटी रुपयांच्या पोषण मूल्य आधारित खतांच्या सबसिडीला केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. फॉस्फेट आणि पोटॅश आधारित ही खतं आहेत. यामुळं शेतकऱ्यांना सवलतीत, परवडणाऱ्या दरात आणि वाजवी किंमतीत खतं मिळतील, असं वैष्णव यांनी सांगितलं.*

*प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाला आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता मिळाली. पायाभूत सुविधा विस्तारणे, आर्थिक सक्षमीकरण, दर्जेदार शिक्षण आणि आरोग्य सुविधा याअंतर्गत दिल्या जाणार आहेत. सुमारे साडे पाचशे जिल्ह्यातल्या ६३ हजार गावातल्या ५ कोटींहून अधिक आदिवासींना याचा फायदा होईल.*

*चंद्रयान ४ मोहिम, शुक्र मोहिम आणि सुधारित गगनयान मोहिम, तसंच भारतीय अंतराळ स्थानकाच्या स्थापनेलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. २०४० मध्ये चंद्रावर मानव पाठवण्यासाठी आवश्यक तयारी करणे, त्यासाठी यान चंद्रावर उतरवणे आणि त्यानंतर त्याला पृथ्वीवर परत आणणं या चंद्रयान ४ मोहिमेचा भाग आहे. यासाठी आवश्यक स्वदेशीची बनावटीचं अंतराळ यानाच्या निर्मितीलाही सरकारनं मंजुरी दिली.*

*Animation, Visual Effects, Gaming, Comics आणि Extended Reality या क्षेत्रातलं राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्र स्थापन करायलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मान्यता दिला. या क्षेत्रातल उत्कृष्ट प्रशिक्षण या संस्थेमार्फत दिलं जाईल. )*

**<><><><><>**

इस्रोचं पहिलं मानवरहित अभियान गगनयान तयार होत असल्याचं विक्रम साराभाई अंतराळ केंद्राचे संचालक डॉ. एस. उन्नीकृष्णन नायर यांनी आज सांगितलं. बंगळुरु इथं आठव्या स्पेस एक्सपोच्या वेळी ते वार्ताहरांशी अनौपचारिकपणे बोलत होते. गगनयानाचा अंतराळात प्रक्षेपित करण्याचा भाग तयार झाला असून लौकरच तो श्रीहरिकोटा इथल्या प्रक्षेपण तळावर

पोहोचेल असं ते म्हणाले. गगनयानचं उड्डाण या वर्षाअखेरीपर्यंत अपेक्षित आहे. मुख्य उड्डाणापूर्वी ३ चाचण्या घेतल्या जातील अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं आज एनपीएस वात्सल्य योजनेची सुरुवात केली. लहान मुलांच्या नावे हे राष्ट्रीय पेन्शन योजनेचं खातं असणार आहे. यात वर्षाला किमान १ हजार रुपये गुंतवता येतील, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. मूल १८ वर्षाचं होईपर्यंत कधीही हे खातं पालकांना उघडता येईल. त्यासाठी जन्माचा दाखला, पालकांचं केवायसी आणि पॅन आवश्यक आहे.

**<><><><><>**

संशोधन आणि विकास क्षेत्रात महिलांचा अधिकाधिक सहभाग हा फक्त देशाच्या सांस्कृतिक आणि आर्थिक विकासासाठी महत्त्वाचा नसून महिलांचं जीवनमान उंचावण्यासाठी देखील आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. त्या आज जयपूर इथे मालवीय नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या अठराव्या दीक्षांत समारंभात बोलत होत्या. अलिकडच्या काळात देशात मुलींच्या नोंदणीत वाढ होणं ही आनंदाची बाब असल्याचंही त्या यावेळी म्हणाल्या.

**<><><><><>**

भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार वर्ष २०३०पर्यंत दुप्पट करणं सहज शक्य असल्याचं मत नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बीव्हीआर सुब्रह्मण्यम यांनी व्यक्त केलं आहे. ते आज नवी दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते. २०४७ पर्यंत भारत सर्वाधिक तरुण लोकसंख्येचा देश बनेल आणि दरडोई उत्पन्न २० हजार डॉलर्सच्या आसपास असेल असं भाकित त्यांनी वर्तवलं. हवामान बदलाच्या समस्येच्या पार्श्वभूमीवर हवामानविषयक तंत्रज्ञान आत्मसात करण्याची संधी भारताला आहे असं ते म्हणाले. हरित अर्थव्यवस्थेचा पर्याय स्वीकारण्याची गरज असून २०७० पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जनाचं उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने नीती आयोग कार्यरत आहे असं ते म्हणाले.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरमध्ये आज विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ५८ पूर्णांक १९ शतांश टक्के मतदान झालं आहे. पहिल्या टप्प्यातल्या २४ विधानसभा मतदारसंघांत सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात झाली. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत काश्मीरमधल्या १६ मतदारसंघांपैकी सर्वाधिक ६७ पूर्णांक ८६ शतांश इतकी टक्केवारी पहलगाम इथं नोंदवली गेली. त्राल विभागात सर्वात कमी म्हणजे ४० पूर्णांक ५८ शतांश टक्के इतकं मतदान झालं.

जम्मू विभागात सायंकाळी पाच वाजेपर्यंत ८ मतदारसंघांपैकी किश्तवाड जिल्ह्यातल्या इंदरवाल मतदारसंघात सर्वाधिक ८० पूर्णांक ६ शतांश टक्के

मतदान झालं आहे. रामबन मध्ये ४६ पूर्णांक ८ दशांश टक्के इतक्या मतदानाची नोंद झाली.

**<><><><><>**

हरयाणा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी आज नवी दिल्लीत पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात दिलेल्या ७ आश्वासनांची पूर्तता हरयाणामधे काँग्रेसचं सरकार स्थापन झाल्यावर केली जाईल, असं खर्गे यांनी सांगितलं. अंमली पदार्थमुक्त हरयाणा, २५ लाख रुपयांचे मोफत उपचार, पिकांची तात्काळ नुकसान भरपाई, प्रत्येक कुटुंबाला तीनशे युनीट वीज आणि शेतकऱ्यांना किमान आधारभूत दराची कायदेशीर हमी, दोन लाख रोजगार, जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करणार, महिलांना दरमहा दोन हजार रुपये दिले जातील, स्वयंपाकाचा गॅस प्रति सिलेंडर ५०० रुपये दरानं दिला जाईल. तसंच विधवा, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांना दरमहा ६ हजार रुपये निवृत्तीवेतन दिलं जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

केरळमध्ये मलप्पुरम जिल्ह्यातल्या मंजेरी रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णाला मंकीपॉक्स विषाणूची लागण झाली आहे. हा रुग्ण दुबईहून आल्यानंतर चाचणी करण्यात आली, त्यानंतर या संसर्गाची पुष्टी झाली आहे. या पार्श्वभूमीवर केरळ राज्य सरकारने सर्व प्रमुख सरकारी रुग्णालयांमध्ये

विलगीकरण कक्षांची स्थापना केली असून नोडल वैद्यकीय अधिकारी नियुक्त केले आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीतले रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढच्या आठवड्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना भेटणार असल्याचं जाहीर केलं आहे. मिशीगनमधे फ्लींट इथं प्रचार मोहिमेतल्या कार्यक्रमात भारत-अमेरिका व्यापाराविषयी बोलताना त्यांनी ही घोषणा केली. येत्या २१ ते २३ तारखेदरम्यान मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यात ट्रम्प त्यांची भेट घेतील अशी शक्यता आहे.

**<><><><><>**

मेक्सिकोच्या सिनलोआ राज्यात उसळलेल्या हिंसाचारात जवळपास तीस जणांचा मृत्यू झाला आहे तर दोन जवान शहीद झाले आहेत. हिंसाचार उसळलेल्या भागात सुरक्षा व्यवस्था वाढवण्याचा निर्णय घेतल्याचं मेक्सिकोचे संरक्षण मत्री लुईस क्रेसेनसियो सँडोवल यांनी सांगितलं. पोलिसांनी ३० संशयितांना अटक केली असून ११५ बंदुका जप्त केल्या आहेत. अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या दोन गटात संघर्ष उफाळून आल्यानंतर या हिंसाचाराला तोंड फुटलं होतं.

**<><><><><>**